# अंतराळवीर अनिमा पाटील यांचा विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद

## 'डीप स्पेस ड्रीम्स' सादरीकरणातून उलगडली अंतराळातील आव्हाने

सकाळ वृत्तसेवा



### भारतीय तरुणांना मार्गदर्शनासाठी दौऱ्यावर

सध्या कॅलिफोर्नियात वास्तव्य असणाऱ्या एरोस्पेस आणि सॉफ्टवेअर इंजिनिअर, स्पेस सिस्टिम्स मॅनेजर आणि सायंटिस्ट अॅस्ट्रोनॉट कॅंडिडेट अनिमा पाटील भारत दौऱ्यावर आहेत. दरम्यान, भारतातील युवकांना अंतराळ क्षेत्रातील विविध संधी व अंतराळवीर बनण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न याविषयी मार्गदर्शनपर सादरीकरण विविध ठिकाणी त्या करत आहेत.

नाशिक, ता. ७ : क. का. वाघ इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये कल्पना यूथ फाउंडेशनतर्फे नासा ॲस्पायरिंग ॲस्ट्रोनॉट अनिमा पाटील-साबळे यांचे व्याख्यान झाले. या वेळी त्यांनी 'डीप स्पेस ड्रीम्स' या सादरीकरणाद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

अनिमा पाटील यांनी सहभाग घेतलेल्या 'नासा'च्या विविध मोहिमांमधील माहिती, इंटरनॅशनल स्पेसस्टेशनमध्ये अंतराळवीरांना येणाऱ्या अडचणी, भविष्यातील मानवी अंतराळ मोहिमांसमोरील प्रचंड आव्हाने, त्यासाठी लागणारी शारीरिक सक्षमता, कोणत्याही आव्हानाकडे खंबीरपणे तोंड देण्याची मानसिक क्षमता, याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अवकाश मोहिमेदरम्यान कॉस्मिक रेज, जी फोर्स व स्पेस एन्वायरमेंटचा मानवी शरीरावर होणारा घातक परिणाम यावरील संशोधन सुबोधरीत्या उलगडून सांगितले.

प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, कल्पना युथ फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. जयदीप शाह, स्पेस एज्युकेटर अपूर्वा जाखडी, उपाध्यक्ष प्रा. भूषण उगले, सुशांत राजोळे, हेमंत आढाव, पवन कदम उपस्थित होते. अशोका युनिव्हर्सल स्कूल, केंब्रिज इंटरनॅशनल स्कूल, इस्पॅलियर एक्स्पेरिमेंटल स्कूल, बिटको हायस्कूल, सीडीओ मेरी, डीपीएस व इतर शाळा, क. का. वाघ महाविद्यालय व इतर संलग्न संस्था, एमईटी, संदीप फाउंडेशनचे विद्यार्थी, विज्ञान प्रबोधिनी, खगोल मंडळाचे पदाधिकारी व पालक उपस्थित होते.

> अवकाशवीर होण्याची स्वप्ने पाहा, उराशी बाळगा आणि ते प्रत्यक्षात आणण्यासाठी जिद्दीने अथक परिश्रम करा.
> - अनिमा पाटील- साबळे, 'नासा'च्या अंतराळवीर

**दै. सकाळ, दि. ०८-०१-२०१८**

अवतीभवती



क. का. वाघ महाविद्यालय : विद्यार्थी योगेंद्र देवरे याला बुधवारी 'बेस्ट आउटगोईंग स्टुडंट' पुरस्कार देताना प्रिया बागूल. शेजारी डॉ. रमाकांत पाटील, डॉ. नाईक, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर.

# क. का. वाघ महाविद्यालयातील 'मॅफिक'चा शानदार समारोप

नाशिक, ता. १८ : क.का. वाघ इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये १४ ते १७ जानेवारीदरम्यान झालेल्या 'मॅफिक' या सांस्कृतिक महोत्सवाचा बुधवारी (ता. १७) समारोप झाला. प्रिया बागूल, डॉ. बी. एम. नाईक, डॉ. रमाकांत पाटील, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर प्रमुख पाहुणे होते. महोत्सवाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचे सहकार्य लाभले.महोत्सवाच्या पहिल्या दिवशी 'काइट फेस्टिव्हल' आणि 'ब्लॅक डे' साजरा करण्यात आला. दुसऱ्या दिवशी 'नक्षत्रांचे देणे' हा गीत-संगीताचा कार्यक्रम, तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, क्वीझ स्पर्धा आणि इव्हेंट एक्सचे आयोजन करण्यात आले होते, तर शेवटच्या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमांसह यशस्वी विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी 'बेस्ट आउटगोइंग स्टुडंट' हा पुरस्कार मेकॅनिकल विभागाचा योगेंद्र देवरे याला, मिस्टर क.का. वाघ आणि मिस क.का. वाघ हे पुरस्कार आशुतोष श्रीवास्तव व श्वेता शिंपी यांना देण्यात आले. बॅडमिंटन पॅरालिपिंकमध्ये रौप्यपदक मिळविणाऱ्या नीलेश गाकवाडचा विशेष पुरस्काराने सन्मान झाला.

दै. सकाळ, दि. १९-०१-२०१८



के. के. वाघ इंजिनिअरिंग महाविद्यालयात आयोजित मॅफिक महोत्सवात डेजचा आनंद लुटताना विद्यार्थी. याच महोत्सवात झालेल्या 'नक्षत्रांचे देणे' या सुरेल संगीत मैफलीतही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभागी होत सर्वांचीच मने जिंकली.

# के. के. वाघ इंजिनिअरिंगमध्ये रंगले 'मॅफिक'

प्रतिनिधी | नाशिक



के. के. वाघ इंजिनिअरिंगमध्ये आयोजित 'मॅफिक' या सांस्कृतिक महोत्सवात विविध उपक्रम, स्पर्धा, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगत भरली. पहिल्या दिवशी काइट फेस्टिव्हल आणि ब्लॅक डे झाला. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पतंग उडवून आनंद लुटला.

नायलॉन मांजावरील बंदीला विद्यार्थ्यांनी पाठींबा देत साध्या मांजाने पतंग उडवल्या. दुसऱ्या दिवशी 'नक्षत्रांचे देणे' हा सुरेल संगीत कार्यक्रम पार पडला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वक्तृत्व, वादविवाद, रांगोळी स्पर्धा झाल्या. क्वीझ आणि इव्हेंट एक्सचाही यात समावेश होता. तसेच एंजल्स अँड डेमॉन्स, बॅक टू स्कूल, डी. सी. मार्व्हेल अशा अनेक वेशभूषा परिधान करून विविध डेजमध्ये विद्यार्थ्यांनी धमाल केली. या शैक्षणिक वर्षासाठीचा बेस्ट आउटगोइंग स्टुडंट हा पुरस्कार मेकॅनिकल डिपार्टमेंटचा योगेंद्र देवरे याला देण्यात आला. मिस्टर के. के. वाघ आणि मिस के. के. वाघ हे पुरस्कार अनुक्रमे आशुतोष श्रीवास्तव व श्वेता शिंपी यांना देण्यात आला. नीलेश गायकवाड याला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याने बॅडमिंटन या खेळात पॅराऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक मिळवले. यानंतर विविध स्पर्धांमधील विजेते तसेच प्रत्येक तुकडीतील प्रथम क्रमाकाने उत्तीर्ण विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी प्रिया बागूल, डॉ. बी. एम. नाईक, डॉ. रमाकांत पाटील, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर उपस्थित होते. शिक्षक समन्वयक प्रा. जी. बी. डावरे, विद्यार्थी सल्लागार प्रा. व्ही. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी समन्वयक अद्वैत भालेराव, कुणाल मत्सागर यांनी परिश्रम घेतले.

**दै. दिव्य मराठी, दि. २०-०१-२०१८**

# प्रयास संस्थेतर्फे डिजिटायजेशन उपक्रम

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

आधुनिक काळात 'संगणक' हे ज्ञानप्रसाराचे मुख्य माध्यम बनले आहे. परंतु ग्रामीण भागातील मुलांपर्यंत हे साधन उपलब्ध होऊ शकत नाहीत. ही ग्रामीण तसेच आदिवासी भागातील निकड ओळखून के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमधील 'प्रयास युथ फोरम अँण्ड सोशल रिसर्च फाउंडेशन' या संस्थेतर्फे ओझर येथे 'डिजिटायजेशन' उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमांतर्गत जि. प. शाळा भडके वस्ती, ओझर येथे संगणकाचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमासाठी नेटविन इन्फोसोल्युशन्स, के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेज, नाशिकमधील विद्यार्थ्यांचे योगदान लाभले. कॉलेजचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, प्राध्यापक एन. बी. गुरुळे यांनी या उपक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील चिमुकल्यांना तंत्रज्ञान अवगत व्हावे म्हणून प्रकल्प राबविण्यात आला.



**दै. महाराष्ट्र टाइम्स, दि. १९-०१-२०१८**